या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार ७ जुलै २०२४ | अंक२१० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# नांदेडात मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली...


# ८ जुलै रोजी जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडणार

## लाखोंच्या संख्येने समाज बांधव माता भगिनींनी उपस्थित राहावे तयारी अंतिम टप्प्यात.

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : सगे सोयरे कायदा अंमलात आणुन मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण मिळावे , महाराष्ट्रातील आत्तापर्यंत झालेल्या मराठा आंदोलकावरील गुन्हे मागे घ्यावेत या मागण्यासाठी मराठा योद्धा मनोज जरंगे पाटील यांच्या नेतृत्वात दिनांक आठ जुलै रोजी नांदेड शहरामधे सकाळी ११.०० राज कॉर्नर तरोडेकर चौक-राजमाता जिजाऊ चौक-श्रीनगर-महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले पुतळा आय.टी. आय.चौक-शिवाजीनगर-एस. पी.ऑफीस चौक ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसर या मार्गाने भव्य शांतता रॅली निघणार आहे व मनोज जरांगे पाटील हे समाज बांधवास छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातुन संवाद साधणार आहेत. सदरील रॅलीचे नेतृत्व मराठा युद्ध मनोज जरांगे पाटील हे करणार आहेत.

मागील पंधरा दिवसापासुन सदरील रॅलीच्या नियोजनासाठी अखंड मराठा समाज नांदेड जिल्हा व जिल्हा नियोजन समिती यांच्याकडुन रॅलीची जय्यत तयारी करण्यात येत आहे. २०-जुन २०२४ रोजी अखंड मराठा समाज नांदेड जिल्ह्याची एक सामुहिक बैठक पार पडली सदरील बैठकीत अनेक ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले जसे की जिल्हा बैठक,तालुका बैठक, गावागावातील बैठक घेऊन जनजागृती करण्याचं काम समाज बांधवांनी हाती घेतले, तसेच रॅलीच्या नियोजनासाठी लागणारे सर्व साधणांची जबाबदारी सुद्धा वाटुन देण्यात आली अखंड मराठा समाज नांदेड च्या सर्व कार्यकर्त्यांनी व समाजातील सर्व प्रतिष्ठित व्यक्तींनी



आपापली जबाबदारी पार पाडण्यासाठी मागील पंधरा दिवसापासून अथक परिश्रम घेतले आहे आज पत्रकार परिषदेच्या माध्यमातून अखंड मराठा समाज नांदेड जिल्ह्याला तसेच सर्व प्रशासकीय यंत्रणेला जाहीर आवाहन करण्यात येत आहे की, आठ जुलै च्या रॅली संदर्भात ज्या काही सोई सुविधा लागतील त्या सर्व उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाला विनंती करण्यात येत आहे व जिल्हाभरातील सर्व तालुक्यातील, गावागावातील समाज बांधवांना आग्रहाची विनंती करण्यात येत आहे की, मराठा समाजाला ओबिसीतुन कायम टिकणारे आरक्षण मिळण्यासाठी आपण लाखोच्या संख्येने रॅलीमध्ये सहभागी व्हायचं आहे.गाव खेड्यातुन तालुक्यातुन येणाऱ्या सर्व समाज बांधवांसाठी योग्य त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. नवा मोंढा मैदान, शासकीय तंत्र निकेतन, कॅनॉल रोड ,नागार्जुन पब्लिक स्कुल या ठिकाणी पार्किंग ची व्यवस्था करण्यात आली आहे जेवणाची व्यवस्था,पाण्याची व्यवस्था, तसेच रॅली निघणाऱ्या मार्गात जागोजागी खिचडी वाटप रॅलीच्या समारोपाच्या ठिकाणी योग्य अशी साऊंड सिस्टिम ची व्यवस्था, जरांगे पाटील यांच्या ताफ्यामध्ये आंतरवाली सराटी पासुन येणाऱ्या पाहुण्यांची मुक्कामाची व जेवणाची व्यवस्था,मुक्कामाच्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था, रॅली मार्गात जागोजागी सत्कार समारंभ असे सर्व नियोजन जिल्हा नियोजन समितीच्या मार्फत करण्यात आले आहे.

प्रशिक्षित मराठा स्वयंसेवकांची एक मोठी फळी सुद्धा तयार करण्यात आली आहे मराठा सेवकांना लागणारी साधन सामग्री जसे की, टी-शर्ट, गळ्यामध्ये आयडी कार्ड आणि संपुर्ण रॅलीला कव्हर करण्यासाठी शंभर वाकी टॉकीची व्यवस्था सुद्धा करण्यात आली आहे तरी मराठा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने शांतता संवाद रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन अखंड मराठा समाज बांधवांच्या वतीने करण्यात येत आहे.

## राष्ट्रीय समाज पक्षाचे विद्यमान जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांनी मुंबई याठिकाणी पंकजा मुंडे यांच्या निवासस्थानी घेतली भेट

### राष्ट्रीय समाज पक्षाच्या बीड जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने पंकजाताई मुंडे यांचा मुंबईमध्ये सत्कार,



बीड प्रतिनिधी. अंकुश गवळी महाराष्ट्र राज्याच्या माजी ग्रामविकास मंत्री तथा बीडच्या माजी पालकमंत्री पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांची विधानपरिषदेवरची उमेदवारी जाहीर जाहीर झाल्याबद्दल राष्ट्रीय समाज पक्ष बीड जिल्ह्याच्या वतीने मुंबई येथे जाऊन सत्कार करताना बीड जिल्हा अध्यक्ष अण्णासाहेब मतकर , विधानसभा अध्यक्ष माऊली मार्कड, जिल्हा संघटक सोनवणे संदीप ,भाजपचे ज्येष्ठ नेते पुजारी साहेब ,व इतर कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते,

## नारायण गड दिंडीचे प्रस्थान; हजारो भाविकांची मांदियाळी

## नगद नारायणाचा गजर, महंत शिवाजी महाराजांच्या अध्यक्षतेखाली निघते दिंडी



बीड/प्रतिनिधी: नारायणा... नारायणा...श्री नगद नारायणा... असा जयघोष, टाळ, मृदंगाचा निनाद आणि खांद्यावंर भगव्या पताका घेवून पांडूरंगाची आस घेवून निघालेल्या हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत धाकटी पंढरी श्री.नगद नारायण गड येथील दिंडीचे पंढरपुरकडे प्रस्थान दि.६ जुलै रोजी झाले. धाकटी पंढरी श्री.क्षेत्र नगद नारायण गड येथील दिंडीला वर्षाची परंपरा आहे. या दिंडीत जिल्ह्यातील आणि राज्यभरातून भाविक येत असतात. दि.६ जुलै रोजी सकाळीपासून भाविक भक्त गडावर येण्यास सुरूवात झाली होती. जिल्ह्यातील छोट्या दिंड्या दोन दिवसापासून नारायण गड येथे पोहचल्या होत्या. दुपारी ३ वाजेच्या दरम्यान, नगद नारायण गडाचे महंत ह.भ.प शिवाजी महाराज यांच्याहस्ते मंदिरात मुख्य पुजा करण्यात आली. यानंतद प्रदक्षणा घालून दिंडीचे प्रस्थान झाले. दिंडीच्या प्रस्थानवेळी गडाचे विश्वस्त बळीराम गवते, दिलीप गोरे, बी.बी.जाधव, गोवर्धन काशीद, माजी मंत्री प्रा.सुरेश नवले पूज्या ताई मोरे यांची विशेष उपस्थिती होती. शनिवार दुपारी दिंड्या निघाल्यानंतर रस्त्यातील वस्त्यांवर दिंडीचे जोरदार स्वागत करण्यात आले. बेलूरा येथे पहिला मुक्काम असल्याने ग्रामस्थांच्या वतीने दिंडीचे भव्यदिव्य स्वागत करण्यात आले. यासाठी ग्रामस्थ मागील काही दिवसांपासून जय्यत तयारी करत होते. सकाळी बेलूरा येथून दिंडी पुढे नवगण राजुरी, चऱ्हाटा, बेलखंड पाटोदा, कचारवाडी, वैद्यकिन्ही, वैजाळा, पाचेगाव, पाचंग्री, माळवाडी, ईट, पाथरूड, पाटसांगवी, गणेगाव, साकत, जाकेपिंप्री, बावची, खाजगाव, देवगाव, लहूगाव, लुंगसेवस्ती, बारलोणी, कुर्डूवाडी, सोलनंकरवाडी, मोडनिंब, बाभंळगाव, पंढरपूर अशी मार्गस्थ होणार आहे. या दिंडीच्या प्रस्थान कार्यक्रमासाठी जिल्ह्यातून २५ हजार भक्त गडावर दाखल झाले होते.

## उज्जैनकर फाउंडेशन तर्फे केंद्रीय राज्य मंत्री खासदार रक्षाताई खडसे यांचा सत्कार

केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री खासदार रक्षाताई खडसे यांचा नुकताच शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर तर्फे सत्कार करण्यात आला याप्रसंगी फाउंडेशनच्या खजिनदार सौ.संगीता उज्जैनकर यांनी केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री खासदार रक्षाताई खडसे यांचा कोथळी या त्यांच्या निवासस्थानी जाऊन शाल व गुलाब बुके देऊन नुकताच सत्कार केला. याप्रसंगी



उज्जैनकर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवचरण उज्जैनकर फाउंडेशनचे कार्यकारणी सदस्य श्री सी. जे. पाटील सर श्री नितीन भोंबे सर श्री महेंद्र तायडे सर श्री विनोद पाटील सर श्री प्रकाश सोनार श्री गजानन सोनार तसेच उज्जैनकर फाउंडेशनचे उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव श्री गणेश कोळी सर आदी उपस्थित होते . मुक्ताईनगरच्या इतिहासामध्ये प्रथमच केंद्रीय राज्यमंत्री मिळण्याचा हा बहुमान खासदार रक्षाताई खडसे यांच्या रूपाने मिळाला त्याबद्दल शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन तर्फे हा सत्कार करण्यात आला.




A valentine day चित्रपट अतिशय थरारक आणि उत्कंठावर्धक आहे यात शंकाच नाही. स्त्रिया आपला संसार सांभाळून आपली जबाबदारी उत्तमपणे पार पाडू शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे या चित्रपटाची नायिका अनन्या आहे,जी स्वतः पोलीस अधिकारी असून पुरुषांच्या बरोबरीने आपले कार्य लीलया पार पाडते नव्हे प्रसंगी ती आपल्या नवऱ्याच्या देखील विरुद्ध होते.

## चिंचोटी येथे सरपंच भागवत गोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

**वडवणी : वार्ताहार**

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील तरुण तडफदार युवा सरपंच भागवत गोंडे यांचा वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांच वाटप.वृक्षरोपण,तसेच विविध विकास कामांचे उद्घाटन ही गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते करण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की आपण अनेक वेळा आपण पाहतो की अनेकजन आपला वाढदिवस वेगवेगळ्या पद्धतीने जो तो साजरा करत असतो.परंतु गावचे युवा सरपंच भागवत गोंडे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कसल्याही प्रकारचा अपव्यय खर्च न करता फक्त आपले गाव आणि आपल्या गावचा विकास करण्याचे ध्येय मनामध्ये ठरवून गावातील सर्व समाज बांधवांना सोबत घेऊन त्यांनी आपल्या सरपंच पदाच्या कार्यकाळातील हा पहिल्याच वाढदिवसाचे औचित्य साधून गावात विविध विकास कामाचे कामांचे उद्घाटन वृक्षरोपण गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा वाटप करून आपला वाढदिवस शाळेतील चिमुकल्या सोबत साजरा केला.प्रथम संपूर्ण गावकऱ्यांच्या वतीने व शाळेच्या



वतीने सरपंच भागवत गोंडे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. आपल्या सरपंच पदाच्या कारा किर्दीच्या आठ महीण्याच्या कालावधीमध्ये गावात पथदिवे बसवणे,सार्वजनिक स्वच्छालय उभारणे,दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत पेवर ब्लॉक बसवणे,अंडरग्राउंड नाली तयार करणे, सिमेंट रस्ते तयार करणे,आदी विकास कामे केली आहेत.त्यांनी शुक्रवार दि ५ जुलै रोजी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप,शाळेच्या ग्राउंड ला पेवर ब्लॉक व कंपाउंड वॉल चे उद्घाटन,गावात अंडरग्राउंड नाल्यांची उद्घाटन,गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या शुभहस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले.यावेळी ग्रामसेवक सत्यवान काशीद,अशोकराव गोंडे गणेश बापू गोंडे तुकाराम काकडे संतराम आबा गोंडे मुरली येळवे गोरख तात्या गोंडे धर्मराज जाधव उपसरपंच गोविंद गोंडे,मुख्याध्यापक नांदे सर शालेय समितीचे अध्यक्ष साहेबराव गोंडे सर्व ग्रामपंचायत सदस्य सर्व शिक्षक व्रंद गावातील तरुण युवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.उपस्थित सर्वांच्या आभार सरपंच भागवत गोंडे यांनी मानले.

## नाशिक आकाशवाणी केंद्रावर अनुपमा जाधव

के.एल.पोंदा.हायस्कूल, डहाणू येथील उपक्रमशील, आदर्श शिक्षिका, लेखिका, कवयित्री, सामाजिक कार्यकर्त्या, निवेदिका, कथाकार, पर्यावरण प्रेमी अनुपमा जाधव यांचे प्लास्टिक प्रदूषण दूर करु या! हे प्रबोधन गीत, नाशिक आकाशवाणी वर बुधवार दिनांक १०जुलै रोजी सकाळी ७.५०वाजता प्रसारित होणार आहे. तरी आपण सर्वांनी ऐकावे.व इतरांनाही ऐकण्यास सांगावे.रसिक श्रोत्यांना हे प्रबोधन गीत नक्कीच आवडेल.

कवयित्री अनुपमा जाधव यांचे समुद्रसंगीत, वहिवाट,रानझरा , अनुबंध ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तर आगामी पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहे. त्या विद्यार्थी प्रिय शिक्षिका आहेत.शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक कार्यासाठी आजवर त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.तसेच राज्य स्तरावर निबंध व काव्यलेखन ,गायन स्पर्धेत, जिल्हा स्तरीय निबंध व काव्यलेखन व गायन स्पर्धेत त्यांना आजवर अनेक पारितोषिके प्रदान करण्यात आली आहेत.

स्वच्छ भारत अभियान प्रबोधन गीतांची त्यांनी निर्मिती केली असून ,डहाणू नगरपरिषदेच्या घंटागाडीवर त्यांचें गीत वाजवले. साहित्यिक कार्यासाठी त्यांचे योगदान मोठे आहे.स्वच्छ भारत अभियान, या विषयावर त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत.तसेच प्रबोधन गीतांची निर्मिती केली आहे.

घरगुती कचऱ्यापासून कंपोस्ट खत निर्मिती, पर्यावरण जनजागृती उपक्रम, पर्यावरण संवर्धन, घोषवाक्य, निबंध लेखन, काव्यलेखन, चारोळ्या, पथनाट्य लेखन व सादरीकरण केले आहे

वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, पाणी बचत, वन्यजीव,प्राणीवाचवा,झाडेलावा,झाडेजगवा. तसेच राष्ट्रीय हरित सेनेच्या अंतर्गत देखील त्या पर्यावरणाचे कार्य करतात.

तसेच मुंबई आकाशवाणी व रेडिओ एफ.एम.वर देखील त्यांचे विविध कार्यक्रम प्रसारित झाले आहेत.

अनुपमा जाधव यांचे अभिनंदन होत आहे.



# महाराष्ट्र ठरले सर्वोत्कृष्ट कृषी राज्य १५ व्या कृषी नेतृत्व समितीचा पुरस्कार जाहीर

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वीकारणार पुरस्कार पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षेसह विविध शाश्वत उपाययोजनांची दखल

**मुंबई/प्रतिनिधी**

१५ व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीचा २०२४ चा सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार महाराष्ट्राला जाहीर झाला आहे. भारताचे माजी मुख्य न्यायाधीश आणि केरळचे राज्यपाल न्यायमूर्ती पी. सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखालील १५ व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने ही घोषणा केली आहे. नवी दिल्ली येथे १० जुलै रोजी होणाऱ्या सोहळ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हा पुरस्कार स्वीकारणार आहेत. या पुरस्कारांसाठी समितीने राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेतली असल्याची माहिती राज्याच्या कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील सरकारने राज्यात बांबू लागवड, तृण धान्य- श्रीअन्न अभियान आणि औष्णिक वीज निर्मितीत बायोमासचा वापर अशी क्रांतिकारी पावले उचलली आहेत. या पावलांमुळेच हा प्रतिष्ठेच्या मानांकित पुरस्कारावर महाराष्ट्राचे नाव कोरले गेल्याचे श्री पटेल यांनी नमूद केले आहे. हा पुरस्कार १० जुलै रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या १५ व्या कृषी नेतृत्व संमेलनात प्रदान केला जाईल. या संमेलनात केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान तसेच ब्राझील, अल्जेरिया, नेदरलँडचे राजदूत, महाराष्ट्र, यूपी, हरियाणा, हिमाचल प्रदेश, नागालँड या राज्याचे मंत्रीगण व इतर मान्यवर सहभागी होणार आहेत. महाराष्ट्राला हा पुरस्कार मिळणे प्रतिष्ठेचे अत्यंत समाधानाचे असल्याचे नमूद करून श्री. पटेल म्हणाले, युनोचे सरचिटणीस अँण्टिवो गुट्रेस यांनी तपमान वाढीचे युग संपले आहे. आता होरपळीचे युग सुरु झाले आहे. आता तातडीच्या प्रयत्नांची गरज आहे, अशी जगातील कारभाऱ्यांना हाक दिली होती. या हाकेला प्रतिसाद देणारे आणि त्यावर गांभीर्याने पावले उचलणारे असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पहिले नेतृत्व आहे. गुट्रेस यांनी दगडी कोळसा जाळणे थांबवा आणि वृक्षारोपणाची गती वाढवा असे आवाहन केले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने आता २१ लाख हेक्टरवर झाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. तर दगडी कोळसा जाळणे कमी व्हावे यासाठी कोळश्या ऐवजी पाच टक्के बायोमास वापरण्याचा निर्देश देणारे श्री. शिंदे हे पहिलेच मुख्यमंत्री ठरले आहेत. गुट्रेस यांचा मानव जात वाचवण्याच्या हाकेला संवेदनशीलतेने प्रतिसाद देणाऱ्या त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे मुख्यमंत्री म्हणून श्री. शिंदे यांची या पुरस्कारासाठी दखल घेतली गेली आहे. जगात नव्हे, किमान देशात तरी अशी क्रांतिकारी पावले उचलणारे खरोखरच आपल्या मुख्यमंत्री पदासोबतच पर्यावरण व वातावरणीय बदल खात्याचे निर्णय घेणारे श्री. शिंदे पहिले मुख्यमंत्री ठरले आहेत. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने अनेक परिवर्तनकारी



निर्णय घेतले आहेत. यात २१ लाख हेक्टर क्षेत्रावर देशातील सर्वात मोठे बांबू मिशन राबविण्याचा निर्णय आहे. यात नंदुरबार येथील धडगांव तालुक्यातील ७० गावच्या सरपंचांनी केंद्रीय फलोत्पादन सचिव प्रभातकूमार यांच्या समोरच आमचा प्रश्न बांबू लागवडीशिवाय सूटणार नाही, अशी मागणी केली. केंद्रानेही त्याला होकार दिला. या वर्षीच्या राज्याच्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री पवार यांनी नंदूरबार जिल्ह्यातील एक लाख २० हजार एकर जमिनीमध्ये केंद्र आणि राज्य मिळून हरित पट्टा निर्माण करण्याचे जाहीर केले आहे. या अभियानासाठी अर्थमंत्री म्हणून उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी अर्थसंकल्पातही तरतूद केली आहे. याशिवाय सरकारने १२३ प्रकल्पांना मार्गी लावून सुमारे १७ लाख हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण करण्याचा चंग बांधला आहे. नुकतात झालेल्या खरीप आढावा बैठकीत मायक्रो मिलेटचे उत्पादन वाढीसाठी पेरा आणि प्रत्यक्ष उत्पादन वाढीसाठी सर्व संबंधित यंत्रणांना आदेश दिले गेले आहेत. भारतातील पहिले मायक्रो मिलेट क्लस्टर लातूर जिल्ह्यात सुरु करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. तसा प्रस्तावही केंद्राकडे पाठवण्यात आला आहे. पीएम किसान सन्मान निधी दुप्पट करण्याचा निर्णय घेणारे पहिले राज्य महाराष्ट्र ठरले आहे. याशिवाय लाखो शेतकऱ्यांना नॅनो-तंत्रज्ञान खतांचे वितरण करण्याची सुरवातही केली आहे. तृणधान्य अभियानात श्री अन्न म्हणून सावा, राळा-भुरका यांसह विविध तृणधान्यांना प्राधान्य देण्याचे धोरण तयार करण्यात आले आहे. त्यासाठी शंभर कोटी रुपयांची तरतूद करणारे महाराष्ट्र हे अव्वल राज्य ठरले आहे. या तृणधान्यांना एमएसपी देण्याचा निर्णयही महाराष्ट्राने घेतला आहे. नुकताच देशातील विविध सहा ( महाराष्ट्रासह, राजस्थान, म.प्रदेश, गुजरात, गोवा आणि दमण) राज्यांच्या रब्बी पिकांच्या हमी भावाच्या शिफारशीकरिता मुंबईत केंद्रीय कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष विजयपाल शर्मा यांच्या समोर झाली. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच एका राज्याचे मुख्यमंत्री म्हणून श्री. शिंदे आणि कृषी मंत्री धनंजय मुंडे अशा बैठकीत उपस्थित राहिले. या दोघांनीही या बैठकीत ठोस अशी भूमिका मांडली. एमएसपी ठरवणाऱ्या बैठकीत आपल्या राज्याची भूमिका मांडणारे , सत्तर वर्षातील एकमेव मुख्यमंत्री म्हणून श्री. शिंदे यांचा उल्लेख केला जाईल. या शिवाय केंद्रीय कृषी मुल्य आयोगाच्या अध्यक्षांनी आयोगांची व्याप्ती वाढवण्यासाठी केंद्राला प्रस्ताव पाठविला जाईल, असे सुतोवाच केले. हे केवळ मुख्यमंत्री आणि कृषी मंत्र्यांच्या उपस्थितीमुळेच शक्य झाले आहे, असेही श्री. पटेल यांनी नमूद केले आहे. अन्न सुरक्षा आणि पर्यावरणाची काळजी या दोन्ही आघाड्यांवर महाराष्ट्र सरकार काम करत आहे. त्यामागे मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री. पवार यांचा पुढाकार कारणीभूत आहे. अलिकडेच औष्णिक वीज केंद्रांनी बायोमास मध्ये बाबुंचाही वापर करावे असे निर्देश दिले गेले आहेत. यासाठी राज्यातील बांबु लागवडीचे मिशनही उपयुक्त ठरणार आहे. बांबू लागवडीसाठी हेक्टरी सात लाख रुपायंचे अनुदान देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. शिर्डी आणि मुंबईसह शक्य त्या सर्वच विमानतळांच्या ठिकाणी कार्बन फुटप्रिंट कमी करण्याकरिता पोलाद आणि अन्य धातुंच्या ऐवजी बांबुचा वापर करण्यावर भर देण्याचेही राज्य सरकारने धोरण आखले आहे. या सगळ्याचा परिपाक म्हणूनच महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार मिळाला आहे. यापुर्वी हा पुरस्कार २०२३ मध्ये तामिळनाडुला, २०२२ मध्ये उत्तर प्रदेशला मिळाला होता. समितीचे विद्यमान अध्यक्ष न्या. सदाशिवम यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा या पुरस्कार निवड समितीमध्ये समावेश आहे. आतापर्यंत हा पुरस्कार केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, शिवराजसिंह चौहान, ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार अखिलेश यादव तसेच स्व. प्रकाशसिंह बादल, स्व. वर्गीस कुरियन, स्व. एमएस. स्वामिनाथन यांना दिला गेला आहे. अँग्रीकल्चर टुडेच्यावतीने या पुरस्कारांची सुरवात केली आहे. स्व. स्वामीनाथन यांनी दहा वर्षे या संस्थेचे अध्यक्षपद भुषवलेले आहे. सध्या डॉ. एम. जे. खान या संस्थेचे अध्यक्ष आहेत. मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी मानव जातीवरील संकट ओळखून, तिला वाचवण्यासाठी जे निर्णय घेतले आहेत, उपाययोजा केल्या आहेत. त्याबद्दल या तिघांचेही आणि महाराष्ट्राच्या या प्रयत्नांची दखल घेऊन, त्याला पुरस्कार दिल्याबद्दल डॉ. खान यांचे कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष श्री. पटेल यांनी आभार मानले आहेत.

# पहाडासारखे मनोज जरांगे भर स्टेजवर रडले, डोळे पुसत पुसतच सरकारवर हल्लाबोल

## ही उणीदुणी काढण्याची वेळ नाही

मराठ्यांवर मुद्दाम अन्याय केला जातो. सगेसोयरेंची मागणी आपण केली. त्याचा अध्यादेश काढला गेला आहे. त्यात सग्यासोयऱ्यांना आरक्षण देण्याबाबत स्पष्ट लिहिलं आहे. समजा सगेसोयऱ्यांचं आरक्षण नाही मिळालं. ते आरक्षण उडालं. ठिक आहे. मी पुन्हा लढेन. पण ओबीसीतूनच आरक्षण मिळवून देईल. पण मी कुणाला मराठ्यांचा गैरवापर करू देणार नाही. कुणाला पद आणि पैसा मिळवू देणार नाही. मी आरक्षण मिळवून देणारच. काही लोक माझ्या चुका शोधण्याचं काम करत आहेत. मला त्रास देत आहेत. का त्रास देत आहात? आज एकमेकांची उणीदुणी काढण्याची वेळ नाही. समाजावर संकट घोंगावत आहेत. सरकारने आरक्षण नाही दिलं तर पुन्हा मुंबईला यावं लागेल,



मनोज जरांगे पाटील यांचं आजपासून पुन्हा एकदा आंदोलन सुरू झालं आहे. हिंगोलीतून त्यांनी रॅलीला सुरुवात केली आहे. ही रॅली 13 तारखेपर्यंत चालणार आहे. विदर्भातच ही रॅली प्रामुख्याने चालणार आहे. या रॅलीतून मनोज जरांगे मराठा समाजामध्ये जनजागृती करत आहेत. सरकारने काय आश्वासन दिलं आणि पुढची रणनीती काय असेल? आपल्या विरोधात कसं षडयंत्र सुरू आहे, याची माहिती मनोज जरांगे मराठा समाजाला देत आहेत. हिंगोलीत त्यांनी आज मराठा समाजाला संबोधित केलं. स्टेजवरून भाषण करत असतानाच जरांगे यांना अश्रू अनावर झाले. जरांगे भर स्टेजवर रडले. डोळ्यातील अश्रू पुसत पुसतच यावेळी त्यांनी सरकारवर हल्ला चढवला.माझा समाज मोठा होईल म्हणून मी तुमच्यासाठी लढत आहे. माझ्या समाजाने खूप वेदना सहन केल्या आहेत. समाजातील लेकरं मोठी व्हावेत असं वाटतंय. मला सरकारने उघडं पाडण्याचं ठरवलं आहे.जरांगे खूप लढतोय. तो ऐकत नाही. तो निष्ठावंत आहे. त्यामुळेच मला उघडं पाडण्याचं षडयंत्र सुरू झालं आहे. म्हणूनच मला माझी हात जोडून विनंती आहे. मला उघडं पाडू देऊ नका. मला तुमची साथ पाहिजे, असं सांगत असतानाच मनोज जरांगे पाटील यांचा कंठ दाटला. त्यांच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू आले. डोळे पुसत पुसतच समाजाला आवाहन, विनंती, अर्जव करत असतानाच ते सरकारवर हल्लाबोलही करत होते. मॅनेज होणार नाही, फुटणार नाही मी यांना मॅनेज होणार नाही. मी फुटणार नाही. यांनी लोकं मारायला पाठवले तरी हटणार नाही. मी कणखर मराठा आहे, यांच्या मनगटाला मनगट लावायची ताकद आहे. मला बदनाम केलं जात आहे. मराठ्यांचे लोकं फोडून मराठ्यांकडून बदनाम केलं जात आहे. मला आरक्षण आंदोलनातून बाजूला करण्याचा प्रयत्न आहे. आपलेही काही बिनलाजे लोक पत्रकार परिषदा घेऊन उलटंसुलटं बोलत आहेत. त्यांना अमिष दाखवली गेली आहे. माझ्याकडे पैसा नाही, प्रॉपर्टी नाही. मी कुणाचा पैसा घेतला नाही. माझे मराठ्यांचे लेकरं अधिकारी बनलेले मला पाहायचं आहेत, असं सांगत असतानाही मनोज जरांगे पाटील यांच्या डोळ्यात अश्रू होते.

# धारूर पोलीस स्टेशन आवारात वृक्षारोपण ,कर्मचा-यानी संगोपनासाठी घेतले वृक्ष दत्तक.

**किल्ले धारुर/प्रतिनिधी**
धारूर पोलीस स्टेशन चे आवारात सहायक पोलीस निरीक्षक डि बी वाघमोडे व सर्व कर्मचा-यांनी एकत्रित येऊन डोंगराळ भागावर वृक्षारोपण करून हि वृक्ष दत्तक घेऊन हे वाढवण्याचा व जोपासण्याचा संकल्प करण्यात आला. धारूर पोलीस स्टेशन आवारात सर्व डोंगराळ भाग असुन वृक्ष लागवड करून हा भाग हिरवागार करण्यासाठी येथील सहायक पोलीस निरीक्षक डि बी वाघमोडे यांनी वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व कर्मचा-यांना सोबत



घेऊन वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला पोलीस निरक्षक सुरेखा धस यांनी त्यांचे कार्यकालात या आवारात पोलीस स्टेशन चे माघील भागात घनदाट वृक्ष लागवड मोहीमेतून वृक्ष लागवड करून त्याची जोपासणा चांगली केली होती या घनदाट वृक्ष लागवड ने आता चांगले रुप घेतले आहे या कडे जाणारे रस्त्याचे दुतर्फा वृक्ष लागवड करून या पोलीस स्टेशनला परीसर हिरवा गार करण्याचा संकल्प करत सहायक पोलीस निरीक्षक डि बी वाघमोडे यांनी सर्व कर्मचा-याना सोबत घेऊन वृक्षारोपन मोहीम राबवली हि वृक्ष चांगली जोपासण्याचा संकल्प करण्यात आला. या वेळी अधिकारी व सर्व कर्मचारी सहभागी झाले होतो

# काव्यानंद प्रतिष्ठान, पुणे संस्थेचे सुनिल खंडेलवाल यांना 2024 चा महाकवी कालिदास साहित्य साधना पुरस्कार जाहीर

**पुणे/प्रतिनिधी**
पुणे,दिनांक ६ जुलै २०२४-(प्रतिनिधी) महाकवी कालिदास प्रतिष्ठान, पुणे तर्फे महाकवी कालिदास जयंतीचे औचित्य साधून साहित्य, कला , संस्कृती क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या सृजन व्यक्तिमत्त्वाला २०२४ चा साहित्य साधना हा राष्ट्रीय पुरस्कार आज दिनांक ६ जुलै २०२४ रोजी प्रदान करण्यात येणार आहे. अशी माहिती महाकवी कालिदास प्रतिष्ठान, पुणे संस्थेचे अध्यक्ष वि. ग. सातपुते यांनी दिली आहे. पिंपरी चिंचवड येथील साहित्य क्षेत्रात अनेक वर्षे योगदान करणाऱ्या, भरीव कार्य करणाऱ्या काव्यानंद प्रतिष्ठान, पुणे संस्थेचे अध्यक्ष, संस्थापक तसेच साईश इन्फोटेक ॲण्ड पब्लिकेशनचे प्रकाशक व सिद्धहस्त कवी, लेखक श्री. सुनिल अशोक खंडेलवाल यांना शाल, स्मृतीचिन्ह व श्रीफळ देऊन ' साहित्य साधना ' या मानाच्या



पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. गेली पंचवीस वर्षे मराठी, हिंदी भाषेतून रसिकांच्या मनावर आपल्या काव्यप्रतिभेचा ठसा उमटवत, साहित्याची सेवा करत तसेच नवोदितांना व्यासपीठ निर्माण करुन देत मराठी काव्यप्रतिभा चळवळ अखंडित ठेवण्यात त्यांचे विशेष योगदान आहे. श्री. सुनिल खंडेलवाल यांना फ्री प्रेस जर्नल मुंबई व शद्ब खड्ग साप्ताहिक डोंबिवली यांच्या वतीने "साहित्य गौरव पुरस्काराने सन्मानित" करण्यात आले आहे. कै. ग.पां. सातपुते ट्रस्ट, पुणे यांच्यावतीने त्यांना "गजकमल कला संस्कृती* पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पिंपरी चिंचवड च्या साहित्यिक संस्थांनी याबद्दल त्यांचे समक्ष भेटून, फोनवरून अभिनंदन केले आहे. पिंपरी चिंचवड साठी हा सन्मान आहे.

# मराठी फिल्म इंडस्ट्रीमध्ये मराठी चित्रपट, खाकी... लय भारी नवी क्रांती घडवणार



**मुंबई/प्रतिनिधी**
मुंबई - शेवगाव तालुक्यातील पूर्व भागातील डायरेक्टर पांडुरंग गोरे यांचा आगामी मराठी चित्रपट खाकी... लय भारी येत आहे, आज घडीला मराठी चित्रपट सृष्टीमध्ये नवीन, नवीन चित्रपट येत आहे , सैराट नंतर मराठी फिल्म इंडस्ट्रीमध्ये चित्रपट ची संख्या जास्त झाली असून नवीन निर्माते दिग्दर्शक चित्रपटाची निर्मिती करीत आहे , ग्रामीण भागातूनही आता नवोदित दिग्दर्शक मेकर्स व क्रिएटिव्ह डायरेक्टर पुढे येत असून नवीन नवीन विषय घेऊन वास्तव परिस्थिती समोर ठेवून चित्रदर्शी वेगळे विषय घेऊन ,निर्मितीला आता वेग येत आहे, असेच एक ध्येयवेढे स्वप्न पाहिलेले दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांनी पोलीस खात्यावरती आधारित, आपला आगामी मराठी चित्रपट खाकी... लय भारी म्हणजेच देशाच्या दुश्मनासाठी लय डेंजर हा चित्रपट लवकरच चित्रीकरण करण्यासाठी सज्ज होत आहे, बॉलीवूड स्टार चित्रा दीक्षित यांना घेऊन हा चित्रपट तयार करण्यात येत आहे , या चित्रपटाचे मुहूर्त , उद्घाटन खानदेशी साँग फेमस अभिनेत्री ऋतुजा पाटील यांच्या हस्ते होणार आहे, या चित्रपटामध्ये दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांनी ग्रामीण टच दिला असून या चित्रपटात शहरी दहशतवाद आतंकवाद हा दाखवला आहे, यामध्ये सर्व टीम मध्ये सर्वांनी भरपूर मेहनत घेतली आहे, खाकी... लय भारी मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार निर्माते व मुख्य मार्गदर्शक श्री उद्धव फंगाळ साहेब, मार्गदर्शक - सुदामजी संसारे सर, मुख्य - निर्माते - दिग्दर्शक पांडुरंग गोरे , क्रिएटिव्ह डायरेक्टर विकास रायटे सर, सह निर्माते - सपादिका सौ किरण वाघ मॅडम, नागेश गोरे सर, राजेंद्र पोपळघट सर, रवीशा तेलधुणे सर, सह निर्माते सतिश खाडिलकर,सह निर्माते दिलीप वनवे सर, उमेश वानखेडे सर

# स्वराज्यझेप प्रतिष्ठानचा उपक्रम कौतुकास्पद व प्रेरणादायी-स्वामी महादेवानंद भारती महाराज पिंपळवंडी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न



**पिंपळवंडी/प्रतिनिधी** शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे तो पिणारा गुरगुरणारच त्या प्रमाणे विद्यार्थ्यांनी जिद्द-चिकाटी बाळगून खूप अभ्यास करून उच्च पदावर जाण्याचा प्रयत्न करावा.तसेच गुणवंतांनी गुणवत्ता टिकविली पाहिजे.असा उपदेश करत स्वराज्यझेप प्रतिष्ठानचा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी गुरुवर्य स्वामी महादेवानंद भारती महाराज यांनी काढले. पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे दि.५ जुलै २०२४ शुक्रवार रोजी पाटोदा उपतालुकाप्रमुख (ऊबाठा) शिवसेना तथा संस्थापक अध्यक्ष स्वराज्यझेप प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अशोक तात्या पवार व कार्य मंडळाच्या वतीने दहावी-बारावी परीक्षेत गुणवंत ठरलेल्या व नीट, विविध परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थानचे महंत ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज तसेच प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक परमेश्वर सातपुते (उबाठा)शिवसेना जिल्हाप्रमुख बीड,प्रमोद कुदळे उपविभागीय अधिकारी पाटोदा,संदीप पवार सर (आदर्श शिक्षक राष्ट्रपती पुरस्कार) भार्गव सपकाळ सह पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन अंमळनेर हे होते.तर व्यासपीठावर सरपंचपती निलेश मोरे,उपसरपंच दादासाहेब पवार,जिल्हा संघटक रतन गुजर, उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर,शिवसेना शिरूर तालुकाप्रमुख सोपान मोरे,शिवसेना पाटोदा तालुकाप्रमुख मुकुंद शिंदे,प्राचार्य दिलीप पवार,शिवसेना पाटोदा उपतालुकाप्रमुख अशोक पवार तसेच अजिंक्य डोरले,अजय गायकवाड, कृष्णा चौरे,ज्ञानेश्वर पवार,उद्धव शेठ पवार,अर्जुन शेठ पवार,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार, तलाठी वारंगुळे, महेश भालेकर आदींची उपस्थिती होती.या कार्यक्रमातून ह.भ.प.महादेवानंद भारती महाराज,कुदळे साहेब,परमेश्वर सातपुते,संदीप पवार सर,सपकाळ साहेब यांनी विद्यार्थी व विद्यार्थ्यांना भाषणांमधून मोलाचे मार्गदर्शन केले. माणूस वाचनाने ज्ञानी व समृद्ध होतो. विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे लक्ष देऊन गुणवत्ता सिद्ध करावी.शिक्षण आणि नोकरी प्रमाणे रोजगार क्षेत्रात अनेक संधी आहेत.शिक्षणाने अनेक रोजगार मिळतात.शिक्षणामुळे कौशल्य व कला आत्मसात करावी.पूर्वी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या सुविधा नव्हत्या आता भरपूर सुविधा आहेत,त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत संस्कार, अध्यात्मिक ज्ञान असले पाहिजे त्याशिवाय शिक्षणाला महत्त्व नाही.विद्यार्थ्यांनी दर्जेदार शिक्षण घेऊन यशस्वी झाले पाहिजे.बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षण घेण्यासाठी परिश्रम खूपच महत्त्वाचे असतात. विद्यार्थ्यांनी भावी आयुष्याची स्वप्ने पाहिली पाहिजेत.शिक्षणात चढ-उतार होतच असतात.यश अपयश ठरलेले असते.अपयश ही यशाची पायरी असते.अपयशाने खचून न जाता ध्येय साध्य करण्यासाठी जिद्द व चिकाटी समोर ठेवून यशाचे शिखर गाठता येते. वाचाल तर वाचाल हे लक्षात ठेवून पुस्तक व शिक्षकांवर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांनी भविष्य घडवावे.तसेच सावित्रीबाई फुले,महात्मा ज्योतिबा फुले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर,डॉ. अब्दुल कलाम यांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा असे मनोगत यावेळी व्यक्त केले.कार्यक्रमाला विद्यार्थी,शिक्षक,पालक,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अशोक पवार,गोकुळ पवार,शिवाजी पवार,श्रीकांत उकांडे, मनोज भराटे,विजय डांभे,सलीम सय्यद, जयसिंग जरे,चंद्रकांत पवार,कलीम सय्यद,राहुल खोटे आदीसह प्रतिष्ठानच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.आर. पवार सर व राजेश पवार सर यांनी केले. तर आभार प्रतिष्ठानचे अध्यक्ष अशोक पवार यांनी व्यक्त केले.

# पत्रकार जयद्रथ गायकवाड यांना मातृशोक

**केज/सचिन भालेराव**
केज तालुक्यातील शिरुरघाट येथील कौताबाई बंडाजी गायकवाड यांचे दिनांक ५/७/२०२४ रोजी शुकवार सकाळी पाचच्या दरम्यान वृध्पकाळाने दुःखद निधन झाले. शिरुरघाट येथे त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. त्यांच्या रक्षा सावरण्याचा कार्यक्रम दि.७ जुलै रविवार रोजी सकाळी ८:०० वा.शिरुरघाट येथेच ठेवण्यात आला आहे.त्यांच्या पश्चात दोन मुली आणि दोन मुले, नातवंडे असा परिवार असून त्या मिडिया ९ टीव्ही चे बीड जिल्हा प्रतिनिधी जयद्रथ गायकवाड यांच्या मातोश्री होत्या. केज तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव गायकवाड परिवाराच्या दुःखात सहभागी आहेत.

# रवींद्र वायकरांना मुंबई पोलिसांनी क्लीन चिट, म्हणाले गलती से मिस्टेक !

मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं सी समरी रिपोर्ट सादर केला आहे. मुंबई महापालिकेनं गैरसमजातून गुन्हा दाखल केल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे. जोगेश्वरीत मुंबई महापालिकेच्या जागेवर 500 कोटींचं फाईव्ह हॉटेल बांधल्याचा आरोप वायकरांवर होता. महापालिकेच्या 2 लाख वर्ग फुटाच्या जमिनीवर कब्जा केल्याची तक्रार सोमय्यांनी केली होती. आर्थिक गुन्हे शाखेनं गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यातच वायकरांविरोधात गुन्हा दाखल केला होता. ईडीनंही गुन्हा दाखल करुन 9 जानेवारीला वायकरांचं निवासस्थान, मातोश्री क्लब इथं ईडीनं छापेमारी केली होती. पण आता गैरसमजातून वायकरांवर गुन्हा दाखल झाल्याचं मुंबई पोलिसांचं म्हणणं आहे.

# धारूर शहरात दिंडी मधील वारक-यांची आरोग्य तपासणी

**किल्ले धारूर/प्रतिनिधी**
धारूर येथे पालखी मार्गावरुन जाणार्या पालखीतील वारक-याचे आरोग्य तपासणी करून त्यांना गोळया औषध चे वितरण करण्यात आले.या उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत आहे

धारूर येथे आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरला निघालेल्या वारकऱ्यांचे मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषध उपचार करण्यात आले. यावेळी डॉ.मयूर सावंत व डॉ.नवनाथ चव्हाण यांनी सर्व वारक-यांची आरोग्य तपासणी नगरेश्वर मंदिर येथे करण्यात आली. या वेळी युवक कार्यकर्ते अमर महामुनी यांनी वारक-याची जेवनाची व्यवस्था केली होती. या तपासणी शिबीरा साठी सहकार्य म्हणून कुलदीप जगताप,नितीन शेटे,बबलू रेपे ,कुणाल अवगुने,सचिन चोले, निहाल जरगर उपस्थित होते.

# दुसरे संत चोखामेळा साहित्य संमेलन अध्यक्षपदी प्रा. डॉ. संदीप सांगळे यांची निवड

पुणे : संत चोखामेळा अध्यासन केंद्र व वृंदावन फाऊंडेशन , पुणे आयोजित दुसऱ्या संत चोखामेळा साहित्य संमेलन २०२४ अनुषंगाने संबंधित सहयोगी संस्थाची बैठक संत चोखामेळा अध्यासन केंद्राच्या अध्यक्षा प्राचार्या उल्काताई चंदनशिवे - धावारे यांच्या मार्गदर्शनात पार पडली. या बैठकीत संत चोखामेळा महाराज व परिवारातील संताच्या साहित्याचा प्रचार प्रसार करण्यासाठी दुसरे संत चोखामेळा साहित्य संमेलन घेण्यासंदर्भात चर्चा होऊन तीर्थक्षेत्र पैठण या ठिकाणी हे साहित्य संमेलन घेण्याचे नियोजित करण्यात आले. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून संत सोयराबाई यांच्या साहित्याचे अभ्यासक , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे च्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली . ' मध्ययुगीन दलित संतकविता : सामाजिक व वाङमयीन मुल्यमापन ' या संशोधनपर ग्रंथाद्वारे त्यांनी संत सोयराबाई सह चोखामेळा कुटूंबातील सदस्यासोबतच कान्होपात्रा सह अन्य वारकरी संतांच्या साहित्यकृतीचा संशोधनात्मक अभ्यास केला आहे . संत साहित्यात विशेष रुची असणारे प्रा. डॉ. संदीप सांगळे हे शिक्षण प्रसारक मंडळाच्या , तळेगांव ढमढेरे येथील साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालयात प्राध्यापक आणि मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत . संत साहित्य सोबतच सामाजिक व अन्य साहित्यकृती असे विपुल लेखन त्यांनी केले आहे . त्यांच्या प्रकाशित साहित्यकृती विविध पुरस्काराने सन्मानित आहेत .

# अभिषेक सामाजिक संस्था, ईपीएस वर्ल्डवाईड, ओम साई चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे बॅग वाटप...

**मुंबई /प्रतिनिधी**
गोरेगाव पूर्व येथील आरे कॉलनी मधील खडकपाडा येथील शंभर आदिवासी मुलांना शालेय बॅग चे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला अभिनेत्री हेमा शर्मा, गायक निर्मल गुलेरिया, सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे, मोटरमन चंद्रशेखर सावंत, राधिका गुलेरिया, मंगला शिंदे, राजेश दुबे, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते . यावेळी आदिवासी मुलांच्या मनोरंजनासाठी गायक निर्मल गुलेरिया यांनी गाण्याची मैफिल जमवून मुलांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम केला. अभिनेत्री हेमा शर्मा यांनी




मुलांसोबत गप्पा मारल्या तेथील समस्या जाणून घेतल्या मुलांना खूप शिका मोठे व्हा हा कानमंत्र दिला यावेळी पाड्यातील मुलांसाठी व मुलांच्या पालकांसाठी भोजनाचा कार्यक्रम सुद्धा ठेवण्यात आला होता.मुलांनी मनसोक्त भोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सुनीता नागरे यांनी आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे आभार मानले. तसेच मुंबई शहराचे अध्यक्ष सुरज विश्वकर्मा संस्थेचे समन्वयक मधु कुमार राठी, पाड्यातील कार्यकर्त्या वनिता सुतार, प्रसाद मराठे यांनी खूप मेहनत घेतली. दहा वर्षांपूर्वी आम्ही एक बीज लावले होते आज त्या बीजाचा मोठा वटवृक्ष झाला आणि साडेचार हजार आदिवासी मुलांना शैक्षणिक सावली देण्याचं काम हा वटवृक्ष करत आहे . आज खरच आम्हाला खूप आनंद होत आहे की या वटवृक्षा सोबत अनेक छोट्या वेली जोडल्या आहेत आणि ह्या वेली अनेक मुलांना सावली देण्याचे काम करत आहे असे मनोगत संस्थेच्या अध्यक्षा सुनीता नागरे यांनी व्यक्त केलं.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
रविवार ७ जूले २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# आगे आगे देखो होता है क्या, आमचं आरक्षण आम्ही मिळवणारच, जरांगे पाटील यांचा रॅलीत सरकारला इशारा

## दौऱ्यादरम्यान मनोज जरांगे पाटील यांना अश्रू अनावर झाले

### "आपल्या मुलांसाठी आपल्याला लढावे लागेल"

"मराठा आरक्षणाबाबत जनजागृती करा. येत्या १३ जुलैपर्यंत रॅली असेल. त्यामुळे एक दिवस काम बंद ठेवून आपली ताकद दाखवा. एकट्याच्या आणि सर्वांच्या लढण्यात खूप शक्ती असते. आपल्या मुलांसाठी आपल्याला लढावे लागेल. त्यामुळे या रॅलीत सर्वांनी शक्ती दाखवा", असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले आहे."हैद्राबाद गॅझेट, सगे सोयरे यांच्याबाबतीत अशोक चव्हाण यांच्याशी चर्चा झाली. चर्चा झाल्याशिवाय प्रश्न मार्गी लागत नाही. मी कृती आणि अंमलबजावणीवर जास्त विश्वास ठेवतो. सगे सोयरे कायदा आमच्या व्याख्येप्रमाणे करा. हैदराबाद, बॉम्बे, सातारा गॅझेट स्वीकारा", अशी मागणीही जरांगे पाटील यांनी यावेळी केली.



**विशेष/प्रतिनिध** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठवाडा शांतता दौरा सुरु केला आहे. आंतरवाली सराटी येथील उपोषण स्थळावरील ग्रामदेवतेचे दर्शन घेऊन जरांगे पाटील यांनी आपल्या दौऱ्याला सुरुवात केली आहे. हा दौरा 13 जुलैपर्यंत चालणार आहे. या दौऱ्याची सुरुवात शनिवारी हिंगोलीवरुन करण्यात आली आहे. या दौऱ्यात लाखो मराठा बांधवाची गर्दी केली आहे. जागोजागी त्यांचे मोठे स्वागत केले जात आहे. मात्र, या दौऱ्यादरम्यान मनोज जरांगे पाटील यांना अश्रू अनावर झाले. ते म्हणाले की मराठ्यांची लेकरं शिकून पुढे येऊ नयेत म्हणून षडयंत्र रचले जात आहे. मला रोखायचा प्रयत्न केला जात आहे. सरकारला माहीती आहे मराठ्यांना पुन्हा असा नेता मिळणार नाही. म्हणून माझी बदनामी करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मला उघडं पाडण्याचा प्रयत्न होत आहेत. त्यामुळे सरकारने काही केले तरी जोपर्यंत मराठ्यांना आरक्षण मिळत नाही तोपर्यंत माझ्या पाठीशी राहा असेही आवाहन करताना जरांगे पाटील यांचे अश्रू अनावर झाले. जरांगे पाटील यांच्या शांतता रॅलीचे वेळापत्रकही जाहिर झाले आहे. 6 जुलै – हिंगोली, 7 जुलै -परभणी, 8 जुलै -नांदेड, 9 जुलै -लातूर, 10 जुलै -धाराशिव, 11 जुलै – बीड,12 जुलै – जालना, 13 जुलै – संभाजीनगर अशी ही रॅली असणार आहे

# बीड जिल्ह्याचे सिंघम खासदार बजरंग सोनवणेच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन

## माजीमंत्री अशोक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार सोहळा

**केज/सचिन भालेराव** खासदार पदाची शपथ घेऊन दिल्लीहून पहिल्यांदाच जिल्ह्यात येत असलेल्या शेतकरीपुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांच्या भव्य अशा सत्कार सोहळ्याचे आयोजन केज येथे सोमवार दि 8 रोजी करण्यात आले आहे .भूमिपुत्राच्या या सत्कार सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सत्कार सोहळ्याचे स्वागत अध्यक्ष शिवाजी चौधरी व भाई मोहन गुंड यांच्या वतीने करण्यात आले आहे .

माजीमंत्री अशोक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील विठाई मंगल कार्यालयात पार पडणाऱ्या या सोहळ्यास आ संदीप क्षीरसागर , राकॉ चे युवाप्रदेशाध्यक्ष महेबूब शेख , सहाय्यक संचालक डॉ अशोक थोरात , माजी आ पृथ्वीराज साठे , कालिदास आपेट , कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख , शिवसेना उबाठा चे जिल्हाध्यक्ष रत्नाकर शिंदे , माजी सभापती बालासाहेब जाधव , सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले , डॉक्टर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ नरेंद्र काळे , माजी सभापती राजेसाहेब ( पापा ) देशमुख , कळंब तालुकाध्यक्ष श्रीधर भवर , शिवसेना उबाठा तालुकाध्यक्ष अप्पासाहेब जाधव , माजी नगराध्यक्ष पशुपतीनाथ दांगट , राकॉ श प च्या कार्याध्यक्ष संजीवनी देशमुख , कॉँग्रेस तालुकाध्यक्ष प्रवीण खोडसे , जेष्ठ नेते सय्यद साजेद अली , राकॉ प



श प चे केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव , सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष अंगद इंगळे , राकॉ प श प चे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अमर देशमुख , शिवसंग्रामचे केज तालुकाध्यक्ष नामदेव गायकवाड हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत

तसेच यावेळी ख वि संघाचे चेअरमन बालासाहेब बोराडे , व्हाईस चेअरमन दत्तात्रय ठोंबरे , मा जी प सदस्य सुरेश पाटील , उमाकांत भुसारी , प्रेमचंद कोकाटे , महेश गायके , महादेव लाड , युवराज दादा काळे , कबीर इनामदार , शमशोद्दीन इनामदार , प्रकाश कामाजी , महादेव सूर्यवंशी , युवराज दादा गोरे , उत्तम अप्पा मस्के , दिलीप गुळभिले , गोविंद कणसे , तस्लीम इनामदार , हाजी अमजद खतीब , लालासाहेब वायबसे , शीतलताई लांडगे , नसरीन बागवान , कुलदीप करपे , विकास मिरगणे , अशोक सोनवणे , अभय कुलकर्णी , नंदकुमार मोरे , रंजित घाडगे , अजय भांगे , बाबासाहेब मस्के , चंद्रकांत पाटील या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे .

तरी आपल्या भूमिपुत्राच्या होणाऱ्या या भव्यदिव्य अशा सत्कार सोहळ्याचे साक्षी होण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मराठी चित्रपट संघार खाकीचा... दुर्गाप्रसाद वाघ ची डॅशिंगबाज भूमिका...



शेवगाव पांडुरंग गोरे - नागेश फिल्म प्रोडक्शन व आई जगदंबा फिल्म यांच्या संयुक्त विद्यमानाने निर्मित व होत असलेली, देशभक्ती वरती दिग्दर्शक पांडुरंग गोरे यांचा आगामी मराठी चित्रपट खाकी... लय भारी म्हणजे देशाच्या दुश्मनासाठी लय डेंजर हाय, या जबरदस्त कॅच लाईन खाली, या मराठी चित्रपटांमध्ये दुर्गाप्रसाद संजय वाघ यांची डॅशिंग व दमदार छोटी भूमिका आहे , ही भूमिका सुरज जाधव, करणार आहे डिगंबर उर्फ डिगा सोबत आहे यामुळे ही भूमिका उठावदार होणार आहे,या भूमिकेमध्ये त्यांची निवड झाली आहे लवकरच ते आपल्याला या भूमिकेमध्ये आपली स्टायलिश लुक सह अभिनय करताना पडद्यावर , रुपेरी पडद्यावर दिसणार आहे लवकरच या चित्रपटाचे चित्रीकरण चालू होणार आहे, या चित्रपटाचे उद्घाटनासाठी सिने अभिनेत्री बॉलीवूड स्टार चित्राजी दीक्षित व खास आकर्षण खानदेशी फेमस, लावणी सॉंग ऋतुजा पाटील, शिल्पा पवार, श्री उद्धव फंगाळ सर, दिग्दर्शक पांडुरंग गोरे, पत्रकार संजय लहासे, संपादिका. सौ.किरण वाघ मॅडम, सुदामजी संसारे सर , वजीर शेख सर, विक्रम दौंड सर, पंकज कांबळे सर, पत्रकार दिलीप वनवे सर प्रतीक्षा चांदणे वर्धा यांच्या हस्ते या मराठी चित्रपटाचे उद्घाटन मुहूर्त बोधेगाव या शहरात, आई बनौमॉ दर्गा येथे होणार आहे. ची दुर्गाप्रसाद संजय वाघ यांना या चित्रपटासाठी पुढील करियर साठी हार्दिक , हार्दिक, शुभेच्छा.

# अशोक चव्हाणांनी मानले मनोज जरांगेंचे आभार







मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा मराठवाडा दौरा आणि संवाद रॅलीला आजपासून सुरुवात झाली. हिंगोलीतून ही रॅली सुरु झाली आहे. यावर बोलताना राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपचे खासदार अशोक चव्हाण म्हणाले यांनी मनोज जरांगे पाटील यांचे आभार मानले आहेत. मनोज जरांगे पाटलांच्या रॅलीला सर्व स्तरातून पाठिंबा आहे. माझा व्यक्तिशः त्यांच्या प्रयत्नांना, त्यांच्या कष्टांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांच्यामुळे मराठा आरक्षणाचा विषय ऐरणीवर आला. त्यांच्या दौऱ्याला माझ्या व्यक्तिशः शुभेच्छा आहेत. हैदराबाद गॅजेटचा उपयोग होऊ शकतो का? यावरही चर्चा सुरू आहे, असं अशोक चव्हाण म्हणाले. ओबीसी आरक्षणाबाबत काय म्हणाले?ओबीसी समाजाचा नुकसान होऊ नये, ही सुद्धा आमची भूमिका आहे. आमचा प्रयत्न आहे की दोन्ही समाजामध्ये समन्वयाचा आणि चांगलं वातावरण राहो. त्यांचे आरक्षण सुरक्षित राहावं आणि मराठा समाजाला आरक्षण भेटावं अशी आमची भूमिका आहे, असंही अशोक चव्हाण म्हणाले.शिंदे सरकारच्या योजनांवर भाष्यमुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत अंतर्गत 44 लाख शेतकऱ्यांना मोफत वीज देणाची घोषणा केली आहे. गाव तिथे गोदाम या योजनेच्या पहिल्या टप्प्यात शंभर नवीन गोदाम, त्या मूळे शेतमाल योजनेचा लाभ अधिक शेतकऱ्यांना पोहोचणार आहे. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टर पर्यंत पाच हजार रुपये नुकसान भरपाई अनुदान सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सरकारने विशेष मोहीम हाती घेतले आहे, दोन वर्षात 61 प्रकल्प पूर्ण होणार आहेत. 3 लाख 65 हजार हेक्टर वर अपेक्षित सिंचन योजना वाढणार आहे 155 कॅनाल दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाने घेतला आहे,

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com